महसूल विभागाच्या विविध कार्यालयांच्या आस्थापनांवरील आकृतीबंधाबाहेरील एकूण ७२२ अस्थायी पदांना दिनांक ०१/१०/२०१७ ते दिनांक ३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईएसटी-२०१७/प्र.क्र.३१/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ ऑक्टोबर, २०१७.

संदर्भ:-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण १००२/प्र.क्र.६६(भाग-२)/ई-८, दि. २०/०३/२००६.

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.प्राफेब २०१०/प्र.क्र.२६/पुनर्बांधणी-३/म-१०, दि. ३०/०७/२०१३

३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.उविका-२०१६/प्र.क्र.१५/म-१०, दि. ३०/०४/२०१६ (तीन शासन निर्णय)

४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क., दि. १० फेब्रुवारी, २०१७.

५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. ईएसटी-२०१७/प्र.क्र.३१/ई-८, दि.२६/०४/२०१७.

६) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि.०३ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना:-

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/१६/आ.पु.क., दि.१० फेब्रुवारी, २०१७ अन्वये आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या तसेच आकृतीबंधाबाहेरील सर्व अस्थायी पदांना दि.०१/०३/२०१७ ते ३०/०९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले होते. त्यानुषंगाने महसूल विभागाच्या विविध कार्यालयांच्या आस्थापनांवरील आकृतीबंधाबाहेरील एकूण ७२२ अस्थायी पदांना संदर्भाधीन क्र. ५ येथील दि.२६/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१/०३/२०१७ ते दि. ३०/०९/२०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

२. वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ६ येथील क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि. ०३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या आकृतीबंधात समाविष्ट असलेल्या

अस्थायी पदांना तसेच यापूर्वी आढावा मंजूर केल्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या परंतु ज्यांचा समावेश आकृतीबंधात करण्यात आलेला नाही अशा अस्तित्वात असलेल्या सर्व अस्थायी पदांना दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यास अनुसरुन महसूल विभागाच्या विविध क्षेत्रिय कार्यालयांच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद आकृतीबंधाबाहेरील ७२२ अस्थायी पदांना वरील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव / विषय	अस्थायी पदे
१	अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड	४
२	जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद	१२
३	रायगड जिल्ह्यातील माथेरान या गिरीस्थानाकरिता ३ अस्थायी पदे	३
४	अपर जिल्हाधिकारी कार्यालय, मालेगांव, जिल्हा नाशिक	९
५	अपर जिल्हाधिकारी कार्यालय, अहेरी , जिल्हा गडचिरोली	१०
६	मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, जिल्हा औरंगाबाद	७
७	जिल्हाधिकारी कार्यालयात विधी अधिकारी पदाला सहाय्य करण्यासाठी ३५ लघुटंकलेखकांची अस्थायी पदे	३५
८	महसूल प्रशासनातील क्षेत्रीय यंत्रणेतील महसूल मंडळाच्या निकषात बदल केल्यामुळे नव्याने निर्माण केलेल्या अतिरिक्त ५४२ मंडळ अधिका-यांची अस्थायी पदे	५४२
९	अपर तहसिलदार कार्यालय, पिपरी-चिंचवड हवेली जिल्हा पुणे	१३
१०	नवनिर्मित अपर तहसिलदार कार्यालय, गोंदिया	१०
११	अपर जिल्हाधिकारी कार्यालय, जव्हार, पालघर मुख्यालय	११
१२	प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत पुनर्वसन विभागातील अस्थायी पदे	१७
१३	अपर तहसिलदार कार्यालय, औरंगाबाद	१३
१४	नवनिर्मित अपर तहसिलदार कार्यालय, धुळे शहर	१२
१५	नवनिर्मित अपर तहसिलदार कार्यालय, पिंपळनेर, जि. धुळे	१२
१६	नवनिर्मित अपर तहसिलदार कार्यालय, दोंडाईचा, जि. धुळे	१२
	एकूण	**७२२**

शासन निर्णयः-

कोकण/ पुणे/ नाशिक/ अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर विभागातील संदर्भ क्र. ५ येथील

दि.२६/०४/२०१७ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केलेल्या आकृतीबंधाबाहेरील ७२२ अस्थायी पदांना दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि. ०३/१०/२०१७ च्या शासन निर्णयातील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर अस्थायी पदांवर होणारा खर्च संदर्भाधीन क्र. ५ येथील दि.२६/०४/२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्रामधील रकाना- क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ साठी मंजूर झालेल्या अर्थसंकल्पिय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या संदर्भाधीन दि.०३/१०/२०१७ च्या शासन निर्णयात दरम्यानच्या काळात सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी दक्षता घेण्याबाबत वित्त विभागाने निर्देशित केले आहे. त्यानुषंगाने सदर प्रकरणी उचित कार्यवाही करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि-२०१६/प्र.क्र. ८/आपुक, दि.०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७१०२३११५१२९२८१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.10.23 15:06:42 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व जिल्हाधिकारी

३) अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई, जि. बीड/मालेगाव, जि. नाशिक/अहेरी, जि. गडचिरोली /जव्हार, जि. ठाणे.

४) अपर तहसिलदार, पिंपरी- चिंचवड, जि. पुणे/गोंदिया/औरंगाबाद, माथेरान गिरीस्थान (जि. रायगड), धुळे शहर, पिंपळनेर, दोंडाईचा (जि. धुळे)

५) प्रशासक, उल्हासनगर शहर वसाहत पुनर्वसन विभाग (संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत)

६) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखापरीक्षा) १/२, महाराष्ट्र, मुंबई /नागपूर.

७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

९) उप सचिव, कार्यासन (व्यय-९/आ.पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

१०) सह सचिव, कार्यासन ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.

११) उप जिल्हाधिकारी, मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद.

१२) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.